सर्वसाधारण सभा

दि. २८/०९/२०२५ वार : रविवार

ठिकाण:-प्रधान कार्यालय, मॉडेल कॅालनी,पुणे

वेळ:- दुपारी ३:३० वाजता.

**उपस्थिति:-**

| | | |
|---|---|---|
| १.सौ.सुशिलाजी राठी | २.श्रीमती सावित्राजी मुंदडा | ३.सौ.नम्रताजी जाजु |
| ४.सौ.शीलाजी जाजु | ५.श्रीमती निर्मलाजी लाहोटी | ६.सौ.मालतीजी चांडक |
| ७.सौ.अंजलीजी करवा | ८.श्रीमती गीताजी राठी | ९.सौ.मीनाक्षीजी सारडा |
| १०.सौ.पुष्पाजी तोष्णीवाल | ११.श्रीमती मालाजी चांडक | १२.सौ.संगिताजी मुंदडा |
| १३.श्रीमती कल्पनाजी दमाणी | १४.श्रीमती संतोषजी तापडिया | १५.सौ.पुष्पाजी र.राठी |
| १६.श्रीमती सुर्यकांताजी मानधने | १७.सौ.अर्चनाजी ब.लोहीया | १८.सौ.पुष्पाजी गो.राठी |
| १९.सौ.किर्तीजी लड्ढा | २०.श्रीमती मंजुजी झंवर | २१.सौ.सुजाताजी मुंदडा |
| २२.सौ.मंदाजी सु.बिहाणी | २३.सौ.अमिताजी चांडक | २४.सौ.लताजी काबरा |
| २५.सौ.स्नेहलताजी धूत | २६.सौ.सारिकाजी खडलोया | २७.सौ.नेहाजी जाजू |
| २८.उमाजी तोष्णीवाल | २९.सौ.वंदनाजी मुंदडा | ३०.सौ.प्रितीजी लाठी |
| ३१.सौ.अंजलीजी राठी | ३२.सौ.आशाजी भुतडा | ३३.सौ.स्मिताजी मालपाणी |
| ३४.डॉ.अर्चनाजी दरक | ३५.सौ.मंगलजी काबरा | ३६.सौ.कमलजी सोनी |
| ३७.सौ.सुरेखाजी करवा | ३८.सौ.रेखाजी मंत्री | ३९.श्री.प्रकाशजी चांडक |
| ४०.विणाजी चांडक | ४१.श्री.अजयजी नवाल | ४२.सीए माणकचंदजी बाहेती |
| ४३.श्री.संजयजी झंवर | ४४.श्री.पुरूषोत्तमजी गो.मुंदडा | ४५.श्री.वसंतजी राठी |
| ४६.श्री.भवरलालजी पुंगलिया | ४७.श्री.हरिषचंद्रजी चांडक | ४८.श्री.सत्यनारायणजी ब पल्लोड |
| ४९.श्री.परागजी राठी | ५०.श्री.दर्शनजी मुंदडा | ५१.श्री.वसंतजी बंग |
| ५२.श्री.सचिनजी चांडक | ५३.सीए गोपालजी जाजु | ५४.श्री.भरतजी बाहेती |
| ५५.श्री.राजेंद्रजी डाग़ा | ५६.श्री.श्रीकिसनजी तोष्णीवाल | ५७.सीए सचिनजी मंत्री |
| ५८.श्री.ओमप्रकाशजी कासट | ५९.श्री.व्दारकादासजी सारडा | ६०.सीए रोहन कासट |
| ६१.श्री.अशिषजी बिहाणी | ६२.सीए सुशीलजी भंडारी | ६३.श्री.कृष्णकांतजी लखोटीया |
| ६४.श्री.निर्मलजी तोष्णीवाल | ६५.श्री.सचिनजी दरक | ६६.श्री.पंकजजी खडलोया |
| ६७.श्री.आनंदजी भुतडा | ६८.श्री.शिवप्रसादजी मंत्री | ६९.श्री.राजेंद्रजी मंत्री |
| ७०.सौ.लताजी तापडिया | ७१.सौ.शितलजी नावंदर | ७२.श्री.नंदकिशोरजी राठी |
| ७३.श्री.हिरालालजी मालू | ७४.श्री.विठ्ठलजी मनियार | ७५.श्री.अतुलजी लाहोटी |
| ७६.श्री.पुरूषोत्तमजी लोहिया | ७७.श्री.बजरंगदासजी लोहीया | ७८.श्री.राजीवजी मुंद्रा |
| ७९.श्री.निलेशजी लाहोटी | ८०.श्री.अशोकजी चांडक | ८१.श्री.मनिषजी भट्टड |
| ८२.श्री.रमेशजी धूत | ८३.डॉ.मधुसुदनजी झंवर | ८४.श्री.अमोलजी भट्टड |
| ८५.श्री.घनश्यामजी लाहोटी | ८६.श्री.मनिषजी कासट | ८७.श्री.गोकुलजी लाहोटी |
| ८८.श्री.सुरेशजी नावंदर | ८९.श्री.सुभाषजी जाजु | ९०.श्री.ओमप्रकाशजी मनियार |
| ९१.श्री..श्रीकांतजी लखोटीया | ९२.डॉ.शामजी चांडक़ | ९३.श्री.नंदकिशोरजी मु.राठी,मुंबई |
| ९४.श्री.नयनजी नोगजा | ९५.सीए सचिनजी भट्टड | ९६.श्री.योगेशजी बियाणी |
| ९७.श्री.विष्णुकांतजी मानधन्या | ९८.श्री.रविजी काबरा | ९९.श्री.चिरागजी राठी |
| १००.श्री.श्रीकांतजी तापडिया | १०१.श्री.रतनजी राठी | १०२.श्री.चंद्रप्रकाशजी काबरा |

| | | |
|---|---|---|
| १०३.श्री.बालाप्रसादजी बजाज | १०४.श्री.रामप्रसादजी राठी | १०५.श्री.अमोलजी करवा |
| १०६.श्री.मनोजजी जाजु | १०७.श्री.अनुपजी बियाणी | १०७.श्री.नंदकिशोरजी भराडिया |
| १०८.श्री.अश्विनजी चांडक़ | १०९.श्री.कैलासजी सिकची | ११०.श्री.सुभाषजी लोहीया |
| १११.श्री.विनोदजी करवा | ११२.श्री.दिपकजी काबरा | ११३.श्री.अभिजीतजी कासट |
| ११४.श्री.कैलासजी नावंदर | ११५.श्री.अमोलजी मर्दा | ११६.श्री.सचिनजी मंत्री |
| ११७.श्री.प्रमोदजी भुतडा | ११८.श्री.मधुसुदनजी करवा | ११९.श्री.संदीपजी झंवर |
| १२०.श्री.चंदनजी लाहोटी | १२१.श्री.योगेशजी बजाज | १२२.श्री.पांडुरंगजी मर्दा |
| १२३.श्री.रामेश्वरजी जाजु | १२४.श्री.प्रविणजी भन्साळी | १२५.श्री.अमितजी चांडक |
| १२६.सौ.प्रतिभाजी काबरा | १२७.श्री.लक्ष्मीकांतजी नावंदर | १२८.श्री.शेखरजी मुंदडा |
| १२९.श्री.संजयजी जाखोटीया | १३०.श्री.राजेंद्रजी आसावा | १३१.श्री.सुभाषजी मुंदडा |
| १३२.श्री.ओमप्रकाशजी सोमाणी | १३३.श्री.सत्यनारायणजी मालु | |

मंडळाचे सचिव श्री.लक्ष्मीकांतजी नावंदर यांनी सभेला उपस्थित सर्व सदस्यांचे स्वागत करून सभेचे अध्यक्षस्थान मंडळाचे अध्यक्ष श्री शेखरजी मुंदडा यांना स्विकारण्याची विनंती केली. येणेप्रमाणे श्री शेखरजी मुंदडा यांनी सभेचे अध्यक्ष स्थान स्विकारून पुन:श्च सर्वांचे स्वागत केले व सभेस विषयानुरूप सुरूवात करण्यात आली.

तत्पूर्वी मंडळाच्या विश्वस्त सौ.सुशिलाजी राठी यांनी अहवाल वर्षात दिवंगत सदस्य, कार्यकर्त्यांना श्रध्दांजली अर्पीत करण्यात येते असे सभेस सांगितले. येणेप्रमाणे खालील दिवंगतांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

**शोकप्रस्ताव**

| अ.क्र | शोकप्रस्ताव भेजा हुआ दि, | शोकप्रस्ताव भेजा उनका नाम | गांव | रिश्ता | मृत व्यक्ति नांम |
|---|---|---|---|---|---|
| १ | ०१.०४.२०२५ | श्री.रवींद्रजी मिणियार<br>श्री.सुरजजी मिणियार<br>श्री.प्रकाशजी मिणियार | सोलापुर | पिताजी | स्व. राजगोपालजी गोविंदलालजी मिणियार, सोलापुर |
| २ | १८.०४.२५ | श्री.अशोकजी बसेर | पुणे | जिजाजी | स्व. श्री.बालकिसनजी जाजु, ठाणे |
| ३ | १८.०४.२०२५ | श्री.मिलिंदजी जाजू<br>श्री.मेघदूतजी जाजू | ठाणे | पिताजी | स्व. श्री.बालकिसनजी जाजु, ठाणे |
| ४ | २२.०४.२०२५ | सौ.मोनिकाजी सोमाणी | हैद्राबाद | माताजी | स्व. श्रीमती कमलजी लाठी, पुणे |
| ५ | २२.०४.२०२५ | डॉ.सपनाजी करवा | श्रीरामपुर | माताजी | स्व. श्रीमती कमलजी लाठी, पुणे |
| ६ | २२.०४.२०२५ | मंजुषाजी आशिषजी लाठी | पुणे | सासुजी | स्व. श्रीमती कमलजी लाठी, पुणे |
| ७ | २४.०४.२०२५ | श्री.सुनीलजी झंवर<br>श्री.शामजी झंवर<br>श्री.महेशजी झंवर | पुणे | माताजी | स्व. श्रीमती कौसल्याबाईजी बाबुलालजी झंवर, पुणे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | २९.०४.२०२५ | सौ.पुष्पाजी रतनजी राठी | पुणे | जेठजी | स्व डॉ.कमलजी लक्ष्मीनारायणजी राठी, सोलापुर |
| ९ | २९.०४.२०२५ | श्री.जितेंद्रजी राठी | सोलापुर | बडे पापा | स्व डॉ.कमलजी लक्ष्मीनारायणजी राठी, सोलापुर |
| १० | ०७.०५.२०२५ | श्री.सुदर्शनजी राठी | पुणे | पत्नी | स्व निर्मलाजी राठी, पुण |
| ११ | ३०.०५.२०२५ | श्री.अजितजी सारडा<br>श्री.प्रकाशजी सारडा<br>श्री.राजेशजी सारडा | पुणे | माताजी | स्व व्दारकाबाई बद्रिनारायणजी सारडा, पुणे |
| १२ | १४.०६.२०२५ | श्री.श्रीवल्लभजी बांगड<br>श्री.श्रेयसजी बांगड<br>सौ.श्रध्दाजी भंडारी | पुणे | पत्नी<br>माताजी | स्व सौ.मंगलाजी श्रीवल्लभजी बांगड, पुणे |
| १३ | ०७.०७.२०२५ | श्री.अमोलजी भट्टड<br>श्री.भरतजी भट्टड<br>सौ आरतीजी | पुणे | माताजी | स्व सौ.ताराजी प्रकाशजी भट्टड, पुणे |
| १४ | ०७.०७.२०२५ | सौ.प्रियाजी भट्टड | पुणे | सासुजी | स्व सौ.ताराजी प्रकाशजी भट्टड, पुणे |
| १५ | २२.०७.२०२५ | श्री.श्यामसुंदरजी पुखराजजी भंडारी | सोलापुर | पत्नी | स्व सौ. लीलावतीजी भंडारी, सोलापुर |
| १६ | २२.०७.२०२५ | श्री.आनंदजी भंडारी<br>श्री.शरदजी भंडारी | सोलापुर | माताजी | स्व सौ. लीलावतीजी भंडारी, सोलापुर |
| १७ | ३०.०७.२०२५ | श्री.नंदकिशोरजी मूंदडा | सोलापुर | पिताजी | स्व. गोविंदलालजी मिश्रीलालजी मूंदडा, सोलापुर |
| १८ | ०६.०८.२०२५ | श्रीमती अरूणाजी लाहोटी | पुणे | पती | स्व.महेशजी राधाकृष्णजी लाहोटी,पुणे |
| १९ | १३.०८.२०२५ | श्री.ललितजी फोफळे<br>सौ.मोनिकाजी फोफळे | पुणे | सासुजी<br>माताजी | स्व श्रीमती कुसुम लता माहेश्वरीजी, हाथरस |
| २० | ०८.०९.२०२५ | श्री.शेखरजी मुंदडा<br>श्री.विकासजी मुंदडा | पुणे | पिताजी | स्व श्री.रामबिलासजी मुंदडा, कोपरगांव/ पुणे |
| २१ | ०८.०९.२०२५ | सौ.स्वातीजी मुंदडा | पुणे | ससुरजी | स्व श्री.रामबिलासजी मुंदडा, कोपरगांव/ पुणे |
| २२ | ०८.०९.२०२५ | श्री.जुगलकिशोरजी मालू | पुणे | बेटा | स्व श्री.शैलेशजी जुगलकिशोरजी मालू, पुणे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २३ | ०८.०९.२०२५ | श्री.ओमप्रकाशजी कासट | पुणे | बंधू | स्व श्री दीपकजी श्रीकिसनजी कासट, अमरावती |
| २४ | ०८.०९.२०२५ | श्री.विजयजी राठी<br>श्री.विनयजी राठी | पुणे | पिताजी | स्व श्री घनश्यामदासजी श्रीनिवासजी राठी, पुणे |
| २५ | १५.०९.२०२५ | श्री.श्रीकांतजी बिर्ला | पुणे | माताजी | स्व श्रीमती चंद्रभागाबाई रामचंद्रजी बिर्ला, पुणे |

**विषय क्र.१:-मंडल की सर्वसाधारण सभा दि. २८.०९.२०२५ के इतिवृत्तको मंजूर करना ।**

सभाध्यक्षांनी सांगितले कि, दि.२८.०९.२०२५ रोजीच्या सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत मंडळाच्या विश्वस्त व गव्हर्निंग कौन्सील सदस्यांनी मागील सभेमध्ये काही सुचना व दुरूस्त्या सुचविलेल्या होत्या. त्याप्रमाणे सदर बाबी वार्षिक अहवालात व कार्यवृत्तांत करण्यात आल्या आहेत असे सांगून मंडळाचे सचिव श्री.लक्ष्मीकातजी नावंदर यांना कार्यवृत्तांत सभेसमोर वाचन करावे असे सांगितले. येणेप्रमाणे सचिव श्री.लक्ष्मीकातजी नावंदर यांनी सभेला माहिती दिली कि, कार्यवृत्तांत व अहवाल मंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आले होते. तसेच कार्यवृत्तांतामध्ये विश्वस्त व गव्हर्निंग कौन्सील सभेने सुचविल्याप्रमाणे दुरूस्ती करण्यात आली आहे. यावर सभेने सुचविले कि, संपूर्ण कार्यवृत्तांत सभेसमोर वाचण्याची आवश्यकता नाही केवळ कार्यवृत्तांत व अहवालात ज्या दुरूस्त्या केल्या असतील त्या सांगाव्यात. यानंतर सचिव श्री.लक्ष्मीकातजी नावंदर यांनी करण्यात आलेल्या दुरूस्त्या सभेसमोर सांगितल्या व आवाहन केले कि, या व्यतिरिक्त काही दुरूस्ती किंवा सुचना असल्यास सुचवाव्यात. यावर सभेने कार्यवृत्तांत सर्वानुमते मंजुर असल्याचे सांगितले.

सुचक:-श्री.अतुलजी लाहोटी
अनुमोदक:-श्री.सचिनजी चांडक

**विषय क्र.२:- नवनियुक्त पदाधिकारीयों व्दारा गत ६ महिनों के कार्यकाल में हूए कार्योकी जानकरी लेना ।**

मंडळाचे अध्यक्ष श्री.शेखरजी मुंदडा यांनी याविषयी सभेला माहिती दिली कि, यापूर्वी मंडळाचे ५ पदाधिकारी होते त्यात आता ४ उपाध्यक्षांना ही आम्ही सामाविष्ठ केले आहे. मंडळाचे कार्य वाढत चालले आहे. ते योग्य पध्दतीने व सरलतेने चालावे म्हणून ९ पदाधिका-यांमध्ये कामाची विभागणी केली गेली व जबाबदारी दिली जाते परंतु कुठलाही निर्णय घेतांना ९ पदाधिका-यांच्या संमतीनेच तो निर्णय घेतला जातो. त्याचप्रमाणे " वसुधैव कुटुंबकम " ही संकल्पना राबवून आपण कार्य करत आहोत मंडळाच्या कार्यकर्त्यांना आवश्यकतेनुसार कार्य करण्याचे तसेच स्थानिय समितीला आवश्यक निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. नविन पदाधिका-यांनी अनेक कामं हाती घेतलेली आहेत व त्यांची सुरूवात देखील झाली आहे. झालेल्या कामांची सर्वसाधारण सभेला माहिती व्हावी म्हणून मंडळाचे पदाधिका-यांनी ती प्रस्तुतीकरणाच्या माध्यमातून सभेसमोर मांडावी असे आवाहन पदाधिका-यांना केले. येणेप्रमाणे पदाधिका-यांनी सुरू असलेल्या कामांची व पुढील वाटचालीची माहिती सभेसमोर प्रस्तुत केली.

श्री.शेखरजी मुंदडा- अहिल्यानगर येथिल वसतिगृहाला ब-याच वर्षापासून म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नाही म्हणून सदर प्लॉटवर नविन उपक्रम करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. याठिकाणी सी.बी.एस.ई शाळा करण्याचा मानस आहे. यासंदर्भात येथिल स्थानिय समितीने सोलापूर येथिल शाळेला भेट दिली. सोलापूर येथिल शाळा प्रकल्प अत्यंत सुंदर व नाविन्यपुर्ण होत आहे यामागे विश्वस्त श्री.अतुलजी लाहोटी व सोलापूर येथिल कार्यकर्ते व पदाधिकारी यांची अथक मेहनत दिसते.

लोणी प्रवरानगर येथिल मालमत्ता विक्रि संदर्भात काम सुरू केले आहे. संगमनेर येथिल मालपाणी परिवार यांना सोबत घेऊनच यासंदर्भात पुढील प्रक्रिया केल्या जातील.

श्री अभयजी भुतडा यांच्या अभय भुतडा फांउडेशनच्या वतीने मंडळातर्फे यावर्षी रू.५० लाख रक्कमेची छात्रवृत्ती वितरित करण्यात आली. प्रति विद्यार्थी रू.१ लाख अशी छात्रवृत्ती रक्कम विद्यार्थ्यांना दिली गेली याच्यात मेरीट बेस २५ विद्यार्थी व आर्थिक दृष्टया गरजू २५ विद्यार्थ्यांना हि रक्कम देण्यात आली. श्री.अभयजी भूतडा यांनी दरवर्षी दानराशी देण्याचे आश्वासित केले आहे. यासोबत श्री रामनारायण बुब मेमोरियल ट्रस्ट यांच्या वतीने मंडळ संचलित पुणे येथिल वसतिगृहांमध्ये ज्या विद्यार्थ्यांना फ्रिशिप दिली जाते, परंतु असे विद्यार्थी जे महाविद्यालयाचे शुल्क देखील भरू शकत नाही अशा विद्यार्थ्यांचे शुल्क या ट्रस्टतर्फे भरले जात आहे. यावर्षी १० विद्यार्थ्यांचे शुल्क त्यांनी भरले आहे. याच्यात प्रत्येक वर्षी १० विद्यार्थ्यांची वाढ करण्यात  येणार आहे. त्याचप्रमाणे आवश्यकतेनुसार या विद्यार्थ्यांचे पुढील ४ वर्ष म्हणजे पुर्ण शिक्षण किंवा पदवीपर्यंत चे शुल्क सदर ट्रस्ट मार्फत भरण्यात येणार आहे. आगामी वर्षात या योजनेत २० विद्यार्थी लाभ घेतील. मंडळाकडे आतापर्यंत महाविद्यालयाचे शुल्क भरण्यासंदर्भात कोणताही उपक्रम किंवा योजना कार्यान्वित नव्हती ती यामार्फत सुरू झाली आहे ही मोठी उपलब्धि आहे. सभेला सांगतांना अतिशय आनंद होत आहे कि, मंडळ संचलित वसतिगृहामध्ये आतापर्यंत महाराष्ट्रा बाहेरील ठराविक सिटस् देत होतो, परंतु यावर्षापासून आपण धोरणामध्ये बदल केला व आता महाराष्ट्राप्रमाणेच इतर राज्यातील विद्यार्थ्यांना मंडळ संचलित वसतिगृहांच्या नियमावलीप्रमाणे प्रवेश दिले जातील. यामाध्यमातून मंडळाला संपूर्ण भारतात नविन ओळख मिळेल सदर निर्णय घेण्यासंदर्भात विश्वस्त मंडळाचे व गव्हर्निंग कौन्सील समितीचे ही मार्गदर्शन मिळाले. त्याचप्रमाणे महाराष्ट्र प्रदेश सभा व मंडळ मिळून सिव्हिल सर्व्हिसेसच्या विद्यार्थ्यांचे ॲप्टीटयुड चाचण्या घेण्यात आल्या त्यांचे ही काम उत्कृष्ट पध्दतीने सुरू आहे. मंडळाकडून विविध योजनांच्या माध्यमातून अनेक विद्यार्थी लाभ घेत असतात म्हणून अशा विद्यार्थ्यांची माहिती इतर ट्रस्टला ज्या मंडळासारख्याच छात्रवृत्ती किंवा इतर उपक्रम राबवितात त्यांना देण्याचे ठरविण्यात आले आहे. जेणेकरून आवश्यकतेनुसार सर्वांना त्याचा लाभ मिळेल.

मंडळाचा मोठ्या प्रमाणावर ब्रॅण्ड ज्या उपक्रमामुळे झाला असा माहेश्वरी स्कॅालर अवार्डचा कार्यक्रम जोधपुर येथे महासभेव्दारे आयोजित महासम्मेलनामध्ये घेणार आहोत ही बाब अतिशय मोठी व गौरवाची आहे. या सम्मेलनात अंदाजे साठ ते सत्तर हजार  माहेश्वरी बांधव भेट देणार आहेत. समाजातील प्रतिष्ठीत मान्यवर याठिकाणी येणार आहेत.  दि.९,१०,११ जानेवारी रोजी हे संम्मेलन पार पडणार आहे. याठिकाणी मंडळाने दोन स्टॅाल देखील घेतले आहेत या माध्यमातून एक चांगले ब्रॅण्डींग मंडळाचे करता येईल व मंडळाचे नाव समाजाच्या घराघरापर्यंत पोहचेल.

मंडळाचे कार्य दिवसागणिक वाढत चालले आहे. त्याचप्रमाणे नविन कार्यकर्ते देखील मंडळाशी जुडत आहेत त्यादृष्टीने मंडळाचे आधूनिक स्वरूपाचे मुख्य कार्यालय असणे गरजेचे होते म्हणून मुख्य कार्यालयाचे अद्यावत सुविधांसमवेत नुतनिकरण करण्यात आले आहे. त्यासंदर्भात मंडळाचे सचिव श्री.लक्ष्मीकांतजी नावंदर हे माहिती देतील.  इतरही कामांची माहिती पदाधिकारी देतील असे सांगुन श्री.लक्ष्मीकांतजी नावंदर यांना माहिती देण्याचे आवाहन केले.

श्री.लक्ष्मीकांतजी नावंदर– मंडळाच्या मुख्य कार्यालयाचे नुतनिकरण आवश्यक होते कारण निम्मा स्टाफ मेझानाईन फ्लोअर वर बसायचा सर्व स्टाफ एका फ्लोअरवर असणे गरजेचे होते, कारण दैनदिन संवाद साधणे सोयीचे होते. या कार्यालयाला मंडळाच्या विश्वस्त व मंडळाशी ५० वर्ष जुडलेल्या सौ सुशिलाजी  जुगलजी राठी यांनी उदारदान दिले. श्री जुगलजी राठी देखील मंडळाशी अनेक वर्ष जुडलेले आहेत. आजच या नविन कार्यालयाची पुजा करून उद्घाटन झाले आहे.

महेश विद्यालय संदर्भात मंडळाने निश्चित केले आहे कि, याठिकाणी सीबीएसई शाळा व सेमी इंग्रजीची शाळा व्हावी त्यापध्दतीने अत्याधुनिक व क्षमतेने जास्त असा हा कॅम्पस आपण तयार करणार आहोत त्यादृष्टीने संस्थेचे आर्कि, प्रकाशजी चांडक डिझाईनचे काम करत आहेत. त्यासोबत विविध कन्सलटंट, महेश विद्यालय स्थानिय समिती सोबत, कन्स्ट्रक्शन  क्षेत्रातील तज्ञ कार्यकर्त्यांच्या मिटींगस् आपण घेत आहोत. डिझाईन संदर्भात विश्वस्त श्री.नंदकिशोरजी राठी वेळोवेळी मार्गदर्शन करत आहेत त्यासोबत स्थानिय समिती सदस्य देखील याच्यात सक्रिय आहेत. ड्राईंग तयार झाल्यानंतर किती स्क्रे फुट बांधकाम होईल त्याप्रमाणे प्रकल्प खर्च काढण्यात येईल. पुढील २/३ महिन्यात याच्यावर संपूर्ण कार्यवाही होईल.

मंडळाच्या व्हिजन आणि मिशन संदर्भात अनेक स्तरावर किंवा सदस्यांकडून विचारणा होते कि, मंडळाचे व्हिजन मिशन काय आहे त्याच्यावर मागील काळात चर्चा झाली होती, परंतु ते प्रत्यक्षात अमलात आले नाही म्हणून आता मंडळाचे जी.सी सदस्य श्री.वसंतजी बंग यांच्या नेतृत्वाखाली यासाठी समिती नियुक्त करून यासंदर्भात कार्य सुरू केले आहे. श्री.वसंतजी बंग यांनी

यासाठी २ वर्कशॉप घेतले. त्याच्यात मंडळाचे वरिष्ठ कार्यकर्ते, विश्वस्त, जी.सी सदस्य व इतर सर्व स्टेक होल्डर्स यांचा सामावेश होता. त्यांच्याकडून विविध पध्दतीची माहिती गोळा करण्यात आली. येणा–या २५/३० वर्षामध्ये मंडळाने कसे पुढे जावे यावर अत्यंत सुरेख काम सुरू आहे.

ॲल्युमिनीतर्फे दि.२० व २१ सप्टेंबर ला मंडळातर्फे भुतपूर्व विद्यार्थ्यांचे " आओ फिर मिले हम " हे गेट टूगेदर करण्यात आले सदर कार्यक्रम अतिशय सुंदर झाला. श्री.अभिजीतजी कासट व त्यांच्या संपूर्ण टीमचे ही सभेतर्फे अभिनंदन करण्यात आले. मंडळाचे विश्वस्त श्री.नितिनजी न्याती व सौ. सुलेखाजी न्याती यांनी त्यांच्या कोरिअंथन क्लब ला निवासाची सवलतीच्या दरात सुविधा उपलब्ध करून दिली त्याबाबतही त्यांचे आभार. या गेट टूगेदर माध्यमातून आलेल्या भूतपूर्व विद्यार्थ्यांकडून वि.ना.लाहोटी हॉस्टेल प्रकल्पातील ११८ पैकी १०० रूम चे डोनेशनचे आश्वासन प्राप्त झाले याकरिता मंडळाच्या विश्वस्त सौ.सुशिलाजी राठी यांनी प्रचंड मेहनत घेतली.

मंडळातर्फे विविध उपक्रम तसेच कार्यक्रम राबविण्यात येतात, परंतु प्रत्येक कार्यक्रमामध्ये एकसमानता किंवा स्टॅण्डर्डायझेशन दिसुन येत नाही म्हणून पदाधिका–यांनी निश्चित केले आहे कि, मंडळाने सर्व कार्यक्रमांसाठी SOP तयार करण्यात यावी व त्या चौकटीतच सर्व कार्यक्रम नियोजनबध्द करण्यात यावे. यासाठी समिती गठन केली जाईल.

यानंतर मंडळाचे सचिव श्री.संजयजी जाखोटीया यांनी माहिती दिली कि, मंडळाचे बाणेर येथिल वसतिगृहाचे आपण जॉब करणा–या विद्यार्थ्यांनाही प्रवेश देत असतो. सध्या सदर वसतिगृहात प्रवेश संख्या ब–यापैकी पुर्ण भरलेली आहे. सदर वसतिगृह समितीतर्फे याठिकाणी हॉल आहे तो रिन्होवेट करून मिळावा अशी मागणी होती ती करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे मंडळाच्या मुख्य कार्यालय इमारतीतील ३ –या मजल्यावर राठी हॉल अय्यंगर योगा इन्स्टीट्युटला भाडेतत्वावर देण्यात आला आहे. तसेच मंडळाच्या प्रिमायसेस मधील असलेल्या इतर हॉल्सची ही भाडे तत्वावर देणे संदर्भात पॉलिसी तयार करण्यात आली. तसेच वि.ना.लाहोटी वि.भवनाची जुनी मेस रिन्होवेट करणार आहोत.

उपाध्यक्ष सौ.प्रतिभाजी काबरा यांनी द्रोणालय उपक्रमाची माहिती देतांना सांगितले कि, यावर्षी मे आणि जून मध्ये द्रोणालयाच्या बॅचेस घेण्यात आल्या. द्रोणालयात ९१ विद्यार्थी व ज्युनिअर द्रोणालया मध्ये ४६ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. पुढे वयोगट ३५ ते ६५ च्या लोकांसाठी द्रोणालया घेण्याचा मानस आहे. यानंतर त्यांनी मुकुंदभवन संचलित श्रीमती दुर्गाबाई लोहिया छात्रावास बाबत माहिती दिली कि, सदर छात्रावासामध्ये ११६ मुलीना प्रवेश देण्यात आला आहे. इतर वसतिगृहाप्रमाणे याठिकाणी ही सर्व इव्हेंटस् चे आयोजन केले जाते. त्याचप्रमाणे Wednesday Wisdom चेही आयोजन केले जाते.

श्री.सुभाषजी मुंदडा– ंमंडळ संचलित पुणे स्थित रा.ब.ह.रा.राठी वसतिगृहात कार्यालयाच्या मजल्यावर अद्यावत असा मल्टीपर्पज हॉल त्यासोबत जीम तयार करण्यात आली असून त्याचे उद्धाटन मंडळाचे अध्यक्ष श्री.शेखरजी मुंदडा यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच याठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून वॉल कम्पाऊंड बांधण्यात आली आहे. यासोबत तीनचार वर्षापासून काढण्यात आलेले सोलर पॅनल परत लावण्यात आले आहेत त्यामुळे विजबिलात कपात होत आहे.

उपाध्यक्ष श्री.अमितजी चांडक यांनी माहिती दिली कि, मंडळातर्फे जवळ जवळ ३५ ॲक्टिव्हिटी राबविण्यात येत आहेत. त्यांचे ऑनलाईन किंवा सोशल मिडिया प्लॅट फॉर्मवर प्रेझेंन्स कमी आहे. त्याच्यात स्टॅण्डर्डाझेशन आणुन या माध्यमातून आपण जास्तीत जास्त प्रमाणात आपल्या समाजापर्यंत मंडळाची माहिती पोहचवू शकतो. युनिफॉर्मली ब्रॅण्डींग करणे, संवाद स्टॅण्डर्डाझेशन करणे, याकामी आपण डिजीटल असेट्स् समितीचे गठन केलेले आहे. मंडळाचे सर्व जुने रेकॉर्ड डिजीटल करण्यात आले आहे. महेश विद्यालय येथे १५६ सिटस् क्षमता असलेल्या हॉलचे उद्धाटन करण्यात आले अतिशय सुंदर आणि अद्यावत असा हॉल याठिकाणी वापरात आला आहे.

**विषय क्र.३:– वर्ष २०२४–२०२५ के ऑडीटेड आय–व्यय तथा तुलन पत्र को स्वीकृती देना ।**

**व**

**विषय क्र.४:– वर्ष २०२५–२०२६ के वित्त संकल्प की जानकारी लेकर स्वीकृती देना ।**

मंडळाचे कोषाध्यक्ष श्री.राजेंद्रजी आसावा यांनी सभेसमोर प्रस्तुतीकरणाच्या माध्यमातून आय–व्यय पत्र व तुलन पत्र तसेच वर्ष २०२५–२०२६ चा अर्थ संकल्प सभेसमोर मांडला. अहवालाच्या पृष्ठ क्र,७६ व ७७ वरील लेखा परिक्षक़ांनी मंजूर केलेली सगळी सविस्तर माहिती सभेला त्यांनी दिली. तसेच कॅश फ्लो, ग्रॅास रिसीप्ट, कॅपीटल एक्स्पेन्डीचर, डोनेशनस् संदर्भात संपूर्ण माहिती सभेला त्यांनी दिली.

यानंतर सभेत यादोन्ही विषयांवर सखोल चर्चा झाली व खालील ठराव पारित करण्यात आले.

**ठराव:–** माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळाच्या वर्ष २०२४–२०२५ चे ऑडीटेड आय–व्यय व तुलन पत्रकाला तसेच वर्ष २०२५–२०२६ च्या अर्थसंकल्पास आजची सर्वसाधारण सभा एकमताने मंजूर करून त्यास स्वीकृती देत आहे.

सुचक:– श्री.परागजी राठी
अनुमोदक:– श्री.अनुपजी बिहाणी
ठराव:– सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.५:– वर्ष २०२५–२०२६ के हिसाब की जाँच के लिये लेखा परिक्षक की नियुक्ती एवं उनका परिश्रमिक निश्चित करना ।**

मंडळाचे कोषाध्यक्ष श्री.राजेंद्रजी आसावा यांनी सभेस माहिती दिली की, मागील २ वर्षीपासुन मंडळाचे लेखा परिक्षक मे.व्हिडीए.अॅन्ड असोसिएटस् यांनी उत्तमरित्या मंडळाचे ऑडीट व इतर शासकीय पुर्ततेचे काम साभांळलेले आहे म्हणून सभेने त्यांची फेर नियुक्ती करण्यास हरकत नाही व त्यासंदर्भात विचार करावा.

यानंतर सर्वसाधारण सभेत याविषयी सर्वसाधारण चर्चा करण्यात आली कि, मे.व्हिडीए.अॅन्ड असोसिएटस् यांनी मंडळाचे ऑडीट व इतर शासकीय पुर्ततेचे काम व्यवस्थित पार पाडले आहे. त्यामुळे त्यांची पुर्ननियुक्ती करण्यात यावी. तसेच त्यांचे शुल्क ठरविण्याचे अधिकार मंडळाच्या पदाधिका–यांना दिले जावे. येणेप्रमाणे खालील ठराव पारित करण्यात आला.

**ठराव:–** आजची सर्वसाधारण सभा मे.व्हिडीए.अॅन्ड असोसिएटस् यांची वर्ष २०२५–२६ करिता मंडळाचे लेखा परिक्षक़ म्हणून नियुक्ती करत आहे, त्याचप्रमाणे त्यांचे वार्षिक परिश्रमिकाबाबत वाढ करण्याचे अधिकार मंडळाच्या पदाधिका–यांना एकमताने देत आहे. येणेप्रमाणे कार्यवाही व्हावी.

सुचक:– श्री. रमेशजी धूत
अनुमोदक:– श्री.कैलासजी नावंदर
ठराव:– सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.६:– मंडल व्दारा सोलापूर मे शुरू किए गये सीबीएसई स्कुल के निर्माण कार्य की जानकारी लेना तथा मुलुंड के श्रीमती ल.ला. मुंदडा विद्यार्थी भवन के पुर्ननिर्माण प्रकल्प की जानकारी लेना ।**

सभाध्यक्ष श्री शेखरजी मुंदडा यांनी सांगितले कि, सोलापूर व मुलुंड प्रकल्पाचे प्रमुख आणि मंडळाचे विश्वस्त श्री.अतुलजी लाहोटी यांनी या दोन्ही प्रकल्पाची माहिती सभेला दयावी, विश्वस्त श्री.अतुलजी लाहोटी यांनी यादोन्ही प्रकल्पासंदर्भात सभेला माहिती देतांना सांगितले कि, मंडळाच्या ९६ वर्षाच्या इतिहासातील सर्वात मोठे प्रकल्प आता साकार होणार आहेत. त्याच्यात

सोलापूर प्रकल्प साधारण रू.४० करोड च्या लागतने तयार होत आहे. पुढच्या शैक्षणिक वर्षात येथिल शाळा सुरू होईल. प्रकल्पाचे काम उत्कृष्टरित्या व नियोजन बध्दतेने सुरू आहे. स्थानिक कार्यकर्त्यांची प्रचंड मेहनत नेहमीप्रमाणे बघायला मिळते आहे. श्रीमन्नारायण तथा लक्ष्मीनारायण भगवान मंदीर ट्रस्टची २.५ एकर जागा दिर्घमुदतीने मंडळाने घेऊन याठिकाणी हा प्रकल्प सुरू केला आहे. शाळा सुरू करण्याअगोदर शाळेसंदर्भातील आवश्यक सर्व्हे याठिकाणी करण्यात आले, वेगवेगळ्या नामांकित शाळांना सोलापूर टिमने भेटी दिल्या. वेगवेगळया ३ आर्किटेक्टस् चे डिझाईन आपण करून घेतले व आर्किटेक्ट मनोज मर्दा यांना काम दिले. पुढील शैक्षणिक वर्षासाठी अद्यावत अशी इमारत आपल्या समोर उभी राहणार आहे. नक्कीच या शाळेचे नाव महाराष्ट्रातील उत्तम शाळांच्या यादीत असेल याची खात्री आहे. या शाळेचे प्रमुख दानदाता श्री.श्रीगोपालजी काबरा यांनी उदारमनाने मोठे डोनेशन शाळेच्या नावासाठी दिलेले आहे. येणा–या मे महिन्यामध्ये या नविन वास्तुचे उद्घाटन करण्याचे नियोजन आहे. शाळेची इनटेक क्षमता २५०० ची आहे. या शाळेत पहिल्याच वर्षी ६५० विद्यार्थी प्रवेश घेतील अशी अपेक्षा आहे. ज्या पध्दतीने सोलापूरचे कार्यकर्ते आत्मीयतेने या प्रकल्पावर व इतर शाळांचे काम बघतात नक्कीच हे अभिमानास्पद आहे.

यानंतर त्यांनी श्रीमती ल.ला.मुंदडा वि भवन पुर्ननिर्माण प्रकल्पासंदर्भात माहिती दिली कि, १.३ लाख स्क्वे फुटाच्या बांधकामात एकुण १८ मजल्याची इमारत याठिकाणी होणार आहे. ग्राउंड फ्लोअरला आपण भाडेतत्वावर देण्यासाठी कमर्शिअल करत आहोत, इमारतीमध्ये १८८ मुलांचे व ११६ मुलींचे हॅास्टेल, यासोबत स्कील डेव्हलपमेंट सेंटर, इन्क्युबेशन सेंटर अशा या प्रकल्पाला एकुण रू.८० कोटी खर्च लागणार आहे. याप्रकल्पासाठी आतापर्यंत रू.३७ कोटीचे डोनेशन दानदात्यांकडून आश्वासित झाले आहे. अनेक मोठे व समाजातील प्रतिष्ठित मान्यवरांनी या प्रकल्पासाठी डोनेशन दिले आहे. अजुन प्रकल्प सुरू झाला नाही तरी ऐवढया मोठयाप्रमाणावर डोनेशनचे आश्वासने प्राप्त होत आहे, हा मंडळाचा नावलौकिक आहे. डोनेशनसाठी मुंबईची टिम जसे श्री.वसंतजी चांडक, श्री.राजीवजी मुंद्रा, श्री.सुभाषजी मुंदडा, श्री.मिश्रीलालजी झंवर, श्री.माणकचंदजी काबरा, श्री.रमेशजी काबरा, श्री.नंदकिशोरजी राठी, श्री.दिलिपजी कासट, श्री.अविनाशजी झंवर, श्री.प्रशांतजी कलंत्री मोठया प्रमाणावर काम करत आहेत. ॲल्युमिनी देखील डोनेशनच्या माध्यमातून मंडळाशी जुळत आहेत. सध्याच्या मितीला ड्राईंगवर काम सुरू आहे ते पुढील काही दिवसात अंतिम होतील. याठिकाणी प्लॅाट कॅार्नरला असल्यामुळे कर्वेचर पडले होते त्यासंदर्भात ही काम करतांना थोडा वेळ गेला होता, परंतु आता आयओडी साठी काही अडथळा राहीला नाही. साधारण मार्च/एप्रिल मध्ये याठिकाणी डिमॅालिशनचे काम सुरू होईल अशी अपेक्षा आहे. त्यानंतर येथिल भुमिपूजन करू. नक्कीच हा प्रकल्प मंडळाला एका मोठया उंचीवर नेणारा आहे हे निश्चित आहे.

उपाध्यक्ष श्री.ओमप्रकाशजी सोमाणी यांनी सोलापूर शाळा संदर्भात माहिती दिली कि, येथिल शाळांचे शैक्षणिक तसेच स्पोर्टस्, स्पर्धात्मक परिक्षांचे निकाल हे सर्वोत्कृष्ठ आहेत. त्यामुळे प्रवेशाच्या वेळी अत्यंत प्रेशर असतो पालक आदल्यादिवशी रांगेत फॅार्म भरण्यासाठी उभे असतात असा नावलौकिक शाळांच्या माध्यमातून मंडळाने याठिकाणी कमविलेला आहे. मंडळाची याठिकाणी आता सीबीएसई शाळा सुरू होते आहे, नक्कीच ही ब–याच वर्षापासुनची मागणी होती संस्थेच्या विश्वस्तांनी व पदाधिका–यांनी यासाठी अनेक प्रयत्न केले, अनेक जागा पाहिल्या परंतू शेवटी हा योग आलाय. आता शाळेचे काम जोरात सुरू आहे. सुरूवातीपासुन प्रत्येक गोष्ट अभ्यासुन केली जाते आहे. आमचे कार्यकर्ते दिल्ली, बॅगलोर, मुंबई अशा विविध ठिकाणी शाळा बघण्यासाठी जाऊन आले, किंडर गार्टन कसे हवे त्यासाठी काय गोष्टी लागतात तसेच इतर विद्यार्थ्यांना कोणत्याबाबी आवश्यक असतात, आर्किटेक्टचे काय प्लॅनिंग आहे, आपण कसे केले पाहिजे, खेळाचे मैदान केवढे पाहिजे, काय सुविधा दिल्या गेल्या पाहिजे, लॅब्रोटरीज कशा असल्या पाहीजे, कोणत्या शिक्षण तज्ञांबरोबर किंवा संस्थांबरोबर टाय–अप केले गेले पाहिजे. बांधकाम प्रक्रियेत लागणारे सिमेंट, वाळू, विटा, स्टील व बांधकामासाठी लागणारे साहित्य आपल्याला कमी किमंतीत कशा मिळतील अशा असंख्य गोष्टींचा अभ्यास त्यांनी केला अत्यंत मेहनत सर्वच घेत आहेत. मंडळाचे विश्वस्त आणि पदाधिका–यांचा नेहमीच सोलापूर टीमला नेहमी सपोर्ट मिळतोच. या सभेच्या माध्यमातून एकच सांगतो कि ही शाळा प्रथम वर्षीच पुर्ण क्षमतेने भरेल हे नक्की आहे. आपल्या मुख्य दानदात्यांचे ही मी आभार व्यक्त करतो तसेच या प्रकल्पाचे काम कसे सुरू आहे हे बघण्यासाठी व काही व्हल्यु ॲडीशन करणे गरजेचे आहे का? त्यासाठी सोलापूरला यावे हि विनंती मी सभेला करतो. याच्यापुढे जाऊन मी सांगतो कि, मंडळाने प्रत्येक दोन वर्षानंतर एक शाळा निर्माण करावी त्यास लागणारी सर्वोत्तोपरी मदत सोलापूर टीम कडून केली जाईल.

मंडळाचे अध्यक्ष श्री.शेखरजी मुंदडा यांनी सांगितले कि, सोलापूर प्रकल्पासंदर्भात अतिशय चांगला फिडबॅक सर्वांना आहेच विश्वस्त श्री.अतुलजी लाहोटी यांच्या नेतृत्वामध्ये हे दोन्ही प्रकल्प पुढे जात आहेत. नक्कीच अतिशय उत्कृष्ट असे प्रकल्प तयार होतील हा विश्वास आहे.

यानंतर सभेत सर्वसाधारण चर्चा करण्यात आली व नक्कीच सोलापूर व मुंबई प्रकल्प लवकरात लवकर साकार व्हावे अशा सदिच्छा सभेने व्यक्त केल्या.

**विषय क्र.७:– अध्यक्ष की अनुमती से अन्य विषयोंपर चर्चा एवं निर्णय ।**

सभाअध्यक्ष यांनी सांगितले कि, सदर विषयात एक ही विषय समोर नाही, परंतु सभेतून कोणाला काही सांगायचे किंवा व्यक्त व्हायचे असल्यास त्यांनी व्हावे.

मंडळाचे विश्वस्त श्री.अतुलजी लाहोटी यांनी सांगितले कि, नविन टिम ने मागील सहा महिन्यात जे काम केले आहे. ते प्रस्तुतीकरणाच्या माध्यमातून आपण पाहिले अतिशय चांगली सुरूवात त्यांनी त्यांच्या कार्यामधून दाखवली आहे. त्याबाबत सर्वांचे अभिनंदन ! उपाध्यक्षांना कामाच्या जबाबदा–यांचे वितरण केले हा पण चांगला निर्णय आपण घेतला आहात. सभेच्या माध्यमातून एक आवाहन आपणांस करतो कि, संस्थेने पुढे जातांना इतर संस्थांबरोबर सहयोगाने काम करायला हवे म्हणजे दुप्पट वेगाने संस्था वाढेल.

श्री.अश्विनजी चांडक –महेश विद्यालय पुर्ननिर्माण प्रकल्प आपण हाती घेतला आहे तो करत असतांना शैक्षणिक गुणवत्तेकडे आपण लक्ष देणेही तेवढेच महत्वाचे आहे. मंडळ संचलित सोलापूर आणि पुणे या शांळामध्ये स्टॅण्डर्डाझेशन झाले पाहिजे दोन्ही शाळांच्या समित्यांनी संयुक्त रित्या मिटींगस् घेऊन येणा–या काळात काम केले पाहीजे असे वाटते.

श्री.सचिनजी भट्टड– मंडळातर्फे निड बेस छात्रवृत्ती दिली जाते सदर छात्रवृत्ती देतांना दिली जाणारी रक्कम ४/५ वर्षात लाभार्थीने सेटल झाल्यावर परत करावी म्हणजे पुढच्या गरजू विद्यार्थ्यांला मदत करता येईल व रिकव्हरी प्रक्रिया मंडळाने राबवावी असे वाटते.

श्री.अमोलजी भट्टड– यावर्षी मंडळाच्या बॅलन्सशीट रू.१०१ करोडचे झाले आहे, बँक बॅलन्स एफ डी मिळून एकुण रू.५० करोडच्या पुढे गेले आहेत. एकुण डोनेशनचे आश्वासने ही रू.५० करोडच्या वर प्राप्त झाली आहेत. यासर्व गोष्टी खुप अभिमानास्पद आहेत. त्यामुळे सर्व कार्यकर्त्यांचे अभिनंदन !

श्री.शिवप्रसादर्जी मंत्री–संस्थेचे अल्पसंख्यांक म्हणून नोंदणी प्रमाणपत्र आहे का?

यावर अध्यक्षांनी सांगितले कि, संस्थेला हिंदी भाषीक अल्पसंख्यांक प्रमाणपत्र प्राप्त आहे.

यानंतर श्री.शिवप्रसादजी मंत्री यांनी आपले मत मांडले कि, मंडळाला स्थापन होऊन ९६ वर्ष झाले. अत्यंत गौरवशाली परंपरा मंडळाला आहे व तसेच कार्य मंडळ करत आहे, त्याचप्रमाणे कार्यकर्ते दानदाते ही मंडळाशी जुळलेले आहेत. चांगला निधी मंडळाकडे आहे. या सर्व गोष्टी असतांना पुण्यात शिक्षणाचा ठसा मंडळाला उमटविण्यात यश आलेले नाही त्याकरिता पुण्यामध्ये सर्वोत्कृष्ठ शाळा सुरू करावी असे वाटते.

सचिव श्री.लक्ष्मीकांतजी नावंदर यांनी याविषयी सांगितले कि, नविन पदाधिका–यांच्या टिम ने सर्वप्रथम महेश विद्यालय शाळा प्रकल्प हाती घेतला आहे. आपणा सर्वांचे स्वप्न आहे कि, समाजाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या महेश विद्यालयात प्रवेश घ्यावा एवढेच नाही त्यापलीकडे जाऊन अत्यंत नामांकित शाळा याठिकाणी आपण नावारूपास आणणार आहोत त्यादृष्टीने इन्फ्रास्ट्रक्चर आणि शैक्षणिक धोरणे आपण अवलंबणार आहोत. इंग्रजी माध्यमाचे सी.बी.एस.ई बोर्डामध्ये रूपांतर व सेमी इंग्रजी माध्यम या दोन्ही शाळा शिवाय स्कील डेव्हलपमेंट सेंटर याठिकाणी प्लॅन करत आहोत अतिशय सुंदर प्लॅन्स आर्किटेक्ट प्रकाशजी चांडक करत आहेत. त्यादृष्टीने याआधी सांगितल्या प्रमाणे कन्सलटंट ची नियुक्ती आपण करत आहोत. शाळे संदर्भात व एवढा मोठा

प्रकल्प करत असतांना सर्व स्टेक होल्डर्सना विश्वासात घेऊनच आपण पुढे जाणार आहोत. नक्कीच याठिकाणी आपल्या समाजातील विद्यार्थी प्रवेश घेतील या लेव्हलची स्कुल पुढील ४/५ वर्षात याठिकाणी तयार होईल.

श्री.हिरालालजी मालु– आतापर्यंत मंडळाच्या विविध कांमांबाबत, युनिटस् च्या विकासाबाबत, कार्यकर्त्यांच्या कमिटमेंटबाबत मंडळाच्या कार्यप्रणालीबाबत आपण चर्चा केल्या. मंडळाला स्थापन होऊन ९६ वर्ष झाली आहेत. सोलापूर च्या शाळांचे काम कौतुकास्पद आहेच, मुंबई येथे श्रीमती ल.ला.मुंदडा वि.भवन चा ८० कोटीचा प्रकल्प आपण हाती घेतला आहे, परंतु आपण शिक्षणाच्या माहेरघरामध्ये बसलो आहोत समाजातील मुल–मुली ज्या शाळेत जातील अशी शाळा मंडळाने काढायला हवी. अनेकदा आपण बॅलन्सशिटवर चर्चा करतो ते बघता तुम्ही पुंण्यात जागा घेवू शकता ती घ्यावी व समाजासाठी निवासी शाळा काढावी आपल्याकडे ज्ञान आहे. दानदाते आहेत, कोणताही प्रकल्प आपण हाती घेतो तर निधी कधी कमी पडत नाही अशावेळेला आपण काय विचार करावा ? बाहेरच्या नविन संस्था पुण्यात येऊन शाळा काढतात मग आपल्याला तर ९६ वर्ष झाली आहेत. आपण नक्कीच याच्यावर सकारात्मकतेने विचार करावा असे वाटते.

श्री.अश्विनजी चांडक – यांनी सभेला माहिती दिली कि, आपण PMRDA चे शाळेसाठीचे प्लॅाटस् साठी निलामी मध्ये जागा मिळावी म्हणून सहभाग नोंदवला होता. हिजेंवाडी मान, भोसरी अशा ठिकाणी हे प्लॅाटस् होते. आवश्यक असलेल्या प्लॅाटस् साठी किती रक्क्मेपर्यंत बिडींग करावे हे विश्वस्त सभेत निश्चित करण्यात आले होते. त्याआधी PMRDA कमिशनरला भेटलो आवश्यकते सर्व उपाय आपण केले. परंतु सदर बिडींग आवश्यकतेपेक्षा अतिशय मोठया रक्क्मेपर्यंत गेले म्हणून आपण त्यातुन माघार घेतली, परंतु असे ऑक्शन सुरू असतात त्याचा पुढेही आपण पाठपुरावा करू व नक्कीच शाळेसाठी प्लॅाट मिळविण्यासाठी प्रयत्नशील राहू.

यानंतर मंडळाचे अध्यक्ष श्री. शेखरजी मुंदडा यांनी सांगितले कि, पुण्यात समाजासाठी एक तरी शाळा माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळाने सुरू करावी हे आमचे ही स्वप्न आहे ते सर्वांच्या सहकार्याने आपण नक्कीच पुर्ण करू असा आम्हाला विश्वास आहे.

श्री.विठ्ठलशेठजी मनियार– नवनिर्वाचित टिमचे काम खुप चांगल्या पध्दतीने सुरू आहे. पुढे जाण्याच्या दृष्टीने ते सकारात्मकतेने पाऊल उचलतांना दिसता आहेत. याचा आनंद आहे.

यानंतर सचिव श्री.संजयजी जाखोटीया यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानुन सभा संपल्याचे जाहीर केले.

**सभाध्यक्ष**